**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, **E Mail - pilcbnskr@gmail.com**

---

# प्रेसनोट

दिनांक :- १८/०७/२०१८

## जानोरी, ता.दिंडोरी येथील हायटेक ईडीएम कंपनीचे ऑनलाईन फसवणुकीचे ४६ लाख ४० हजार रुपये नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांनी मिळवुन दिले परत

---

दिंडोरी तालुक्यातील जानोरी येथील हायटेक ई.डी.एम. कंपनीने चीन देशातील सुझोऊ लिस्ट्रॉंग मेकॅनिकल ॲण्ड ईलेक्ट्रीकल कंपनीकडुन ०४ ई.डी.एम. वायर मशिन खरेदी करणेसाठी ऑनलाईन पध्दतीने **YES Bank** व्दारे पेमेंट करण्यात येणार होते. सदर व्यवहारासाठी चीन येथील कंपनीने हायटेक ई.डी. एम. कंपनीस बॅंक अकाउंट नंबर ईमेलव्दारे कळविला होता, त्यानंतर दिनांक २७ जुन २०१८ रोजी अज्ञात इसमांनी चीन येथील सुझोऊ लिस्ट्रॉंग कंपनीचा बनावट ईमेल आयडी तयार करून त्याव्दारे अर्जदार यांना दुसरा अकाउंट नंबर देवुन पेमेंट ट्रान्सफर करण्यास सांगितले, त्याप्रमाणे जानोरी येथील हायटेक ई.डी.एम. कंपनीचे संचालक यांनी सदर बॅंक खात्यावर **सुमारे ४६ लाख ७७ हजार ३६ रुपये** ऑनलाईन पध्दतीने **YES Bank** व्दारे ट्रान्सफर केले होते. दरम्यान सदर बाबत चीन येथील कंपनीचा कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न आल्याने जानोरी येथील हायटेक ई.डी.एम.कंपनीचे संचलकांना फसवणुक झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी दि. ०४ जुलै २०१८ रोजी नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाणेस तक्रार दिली होती.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी सदर ऑनलाईन फसवणुकीबाबत प्राप्त तक्रारीचा आढावा घेतला, तसेच राष्ट्रीयकृत बॅंकांच्या नियमावलींबाबत माहिती घेवुन नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांना तपास करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे सायबर पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ऑनलाईन फसवणुकीबाबत हायटेक ई.डी. एम.कंपनीचे संचालक यांचेकडुन सविस्तर माहिती घेतली, तसेच **YES Bank** व्दारे ऑनलाईन पेमेंट झाल्याचे समजलेवरुन सदर बॅंकेचे नोडल अधिकारी यांचेशी तात्काळ ई-मेलव्दारे पत्रव्यवहार करून संबंधीत कंपनीशी झालेले व्यवहार थांबविण्यास विनंती केली. त्यानुसार दिनांक ०६ जुलै २०१८ रोजी **YES** बॅंकेने सदर व्यवहार रद्द करुन जानोरी येथील हायटेक ईडीएम कपंनीचे बॅंक खात्यात सुमारे **सुमारे ४६ लाख ४० हजार २३० रुपये** रिफंड केले आहे. नाशिक ग्रामीण सायबर विभागाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदर बाबत अत्यंत जलदगतीने तांत्रिक पध्दतीने तपास करून अर्जदार यांची रक्कम परत मिळवुन दिली आहे. नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांनी अतिशय तत्परतेने कारवाई केल्यामुळे हायटेक ई.डी.एम.कंपनीचे संचालक श्री. श्रीकांत शिंदे व पदाधिकारी यांनी मा.पोलीस अधीक्षक सो. यांची भेट घेवुन आभार व्यक्त केले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**, व अपर पोलीस अधीक्षक श्री. **विशाल गायकवाड सो**. यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** स्थागुशा/अति.कार्यभार सायबर पो.स्टे., सायबर विभागाचे **सपोनि तुषार आढावु**, मपोना सोनाली पाटील, आरती पारधी, पोकॉ परिक्षित निकम, प्रमोद जाधव, मपोकॉ प्राजक्ता सोनवणे यांचे पथकाने सदर कामगिरी केली आहे.

नाशिक ग्रामीण सायबर पोलीस विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कुठलीही बॅंक अथवा बॅंकेचे प्रतिनिधी फोन, ई-मेल व वैयक्तिकरित्या खातेदारास त्याचे बॅंक अकाउंट व पासवर्ड बद्दल विचारणा करत नाही. तरी नागरीकांनी आपले बॅंक खाते, डेबिट /क्रेडीट कार्डची गोपनीय माहिती, पासवर्ड किंवा मोबाईलवर आलेला ओटीपी कोणासही देऊ नका. कॅशलेस व्यवहारामुळे सातत्यात वापरात येणारे ईवॉलेट ॲप्लिकेशन वापरत असतांना पासवर्ड दुस-यांना समजणार नाही याची काळजी स्वत:च घ्या. आर्थिक व्यवहार सायबर कॅफेमधुन किंवा दुस-याच्या संगणकावरून करून नका. ऑनलाईन ट्रान्सॅक्शन करतांना ज्या वेबसाईटच्या माध्यमातुन पेमेंट करावयाचे आहे, तिची सुरक्षाव्यवस्था तपासुन घ्या. ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाणे दुरध्वनी क्र. ०२५३-२२००४०८, व ई-मेल **cybercrime.nr@mahapolice.gov.in** यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.